पुणे महानगरपालिका

क्रीडा समिती

तहकुब सभा परिपत्र

क्रीडा समितीची तहकुब झालेली सभा ( बुधवार,दिनांक २५/१/२०१७ रोजी कोरम अभावी तहकुब झालेली सभा ) गुरुवार ,दिनांक ४/५/१७ रोजी सकाळी ११=२५ (अकरा पचंवीस) वाजता म. ज्योतीबा फुले सभागृहात (स्थायी समिती सभागृहात) भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल .

विषय क्र.५१

मा.अशोक येनपुरे व मा.सौ.प्रतिभा ढमाले यांचे दि.१६/१२/२०१६ चे पत्र.

कु.प्रसाद जयंतराव शिंदे,रा.२१८/२२३ शुक्रवारपेठ पुणे २ हा खेळाडू आमच्या परिचयाचा असून तो ट्रायथलॉन या क्रीडा प्रकारात आयरमॅन म्हणून गेले ५ वर्षे प्रतिनिधीत्व करत आहे. तसेच महत्वाचे म्हणजे नुकतेच लंकावी–मलेशिया येथे ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. सदरील स्पर्धेमध्ये ३.८ कि.मी.स्विमिंग १८० कि.मी.सायकलिंग व ४२ कि.मी. रनिंग अशा क्रमाने २२५.८ कि.मी.अंतर पार करण्याची ही स्पर्धा होती. यामध्ये जगभरातील हजारो स्पर्धक सहभागी झालेले होते. परंतु सर्व स्पर्धाकांना मागे टाकून सदरील स्पर्धा ही प्रसाद शिंदे याने आवघ्या १४ तास २८ मिनिटांमध्ये पुणे करत जगभरामध्ये तिरंगा अभिमानाने फडकविला आहे. यामुळे आपल्या पुण्यनगरीचे संपूर्ण जगभरात नावलौकीक झालेले आहे ही आपल्यासाठी अत्यंत अभिमानाचे बाब आहे.

तरी कु.प्रसाद शिंदे यांनी पुढील वर्षी ३० जुलै २०१७ रोजी स्विझरलँण्ड येथे होणाऱ्या स्पर्धेमध्ये भाग घेतला आहे. परंतु कु.प्रसाद जयंतराव शिंदे या खेळाडूची आर्थिक परिस्थिती अत्यंत बिकट असून कु.प्रसाद शिंदे याला स्पर्धेत सहभागी होणेकरीता र.रु.३ लाख इतकी आर्थिक मदत करण्यात यावी.

विषय क्र.५२

सन २०१६–२०१७ मध्ये पुणे महानगरपालिका हद्दतील विविध खेळामंध्ये उल्लेखनिय कामगिरी केलेल्या पात्र ७६,खेळांडूना क्रीडा धोरणानुसार शिष्वृत्ती /अर्थसहाय्य देणेबाबत.मा.अति.महा.आयुक्त(इ)यांचे मआ/क्रीवी/१२३६,दि.३/१/२०१७ चे पत्र.

नगरसचिव

पुणे महानगरपालिका

पुणे महानगरपालिका
क्रीडा समिती
कार्यपत्रिका क्र.२

क्रीडा समितीची पाक्षिक सभा गुरुवार ,दिनांक ४/५/१७ रोजी सकाळी ११=३० (अकरा तीस) वाजता म. ज्योतीबा फुले सभागृहात (स्थायी समिती सभागृहात) भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल .

विषय क्र.४

मा.धीरज घाटे व मा.महेश लडकत,अध्यक्ष,शहर सुधारणा समिती यांचे दि.७/४/२०१७ चे पत्र.

गिरिप्रेमी या महाराष्ट्रातील अग्रगण्य गिर्यारोहण संस्थेचे ज्येष्ठ सदस्य उमेश झिरपे व तरुण गिर्यारोहक विशाल कडूसकर हे जगातील सर्वोच्च शिखर माऊंट एव्हरेस्ट च्या मोहिमेसाठी र.रु.२ लाख देण्यात यावेत.

विषय क्र.५

मा.सौ.अश्विनी नितीन कदम यांचे दि.२०/४/२०१७ चे पत्र.

कु.तेजस बंडू कोंढाळकर हा आंतरराष्ट्रीय स्केंटींग स्पर्धेसाठी परदेशात जात आहे. तरी त्यास पुणे म.न.पा.कडून अर्थसहाय्य मिळावे.

नगरसचिव
पुणे महानगरपालिका